# सातारा जिल्हा परिषद,सातारा (कृषि विभाग)

## जाहिरात

जिल्हा परिषद सेस अंदाजपत्रक सन 2023-24 अंतर्गत सातारा जिल्हयातील शेतक-यांसाठी कृषि विभागामार्फत वैयक्तीक लाभाच्या खालील योजना नियोजन विभागाकडील शासन निर्णय दि.5/12/2016 नुसार थेट लाभ हस्तांतरण पध्दतीने राबविण्यात येणार आहेत. सदर योजनांतर्गत निवड होणा-या शेतक-यांना खालील तांत्रिक निकष/दर्जा असणा-या बाबींसाठी अनुदान देय राहणार असून याव्दारे उक्त योजनांसाठी शेतक-यांचे अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | बाब | देय अनुदान मर्यादा |
|---|---|---|
| 1 | कॅनव्हास/एचडीपीई ताडपत्री (30 स्क्वे.मी.आकारमान) | किंमतीच्या 50% किंवा कॅनव्हास ताडपत्रीसाठी रू.2500/-, एचडीपीई ताडपत्रीसाठी रू.2000/- यापैकी कमी असेल इतके अनुदान |
| 2 | ट्रिपल पिस्टन स्प्रेअर्स इंजिन किंवा मोटारीसह | किंमतीच्या 50% किंवा रू.11000/- यापैकी कमी असेल इतके अनुदान |
| 3 | सायकल कोळपे | किंमतीच्या 75% किंवा रू.1200/- यापैकी कमी असेल इतके अनुदान |
| 4 | 5 किंवा 7.5 एचपी ओपनवेल विदयूत पंपसंच | किंमतीच्या 50% किंवा रू.15000/- यापैकी कमी असेल इतके अनुदान |
| 5 | 3 एचपी ओपनवेल विदयूत पंपसंच | किंमतीच्या 50% किंवा रू.12000/- यापैकी कमी असेल इतके अनुदान |
| 6 | 4 किंवा 5 एचपी डिझेल इंजिन | किंमतीच्या 50% किंवा 4 एचपी इंजिनसाठी साठी रू.12000/-, 5 एचपी इंजिनसाठी रू.15000/- यापैकी कमी असेल इतके अनुदान |
| 7 | एचडीपीई किंवा पीव्हीसी पाईप (प्रती लाभार्थी जास्तीत जास्त 30 पाईपसाठी अनुदान देय राहिल) | किंमतीच्या 50 टक्के किंवा 63 mm HDPE व 75 mm PVC साठी रू. 350/-, 75 mm HDPE साठी रू. 450/-, 90mm PVC व HDPE साठी रू.550/- प्रति पाईप यापैकी कमी असेल इतके |
| 8 | ट्रॅक्टर चलीत रोटाव्हेटर | किंमतीच्या 40 टक्के किंवा रू. 40000/- प्रति नग यापैकी कमी असेल इतके |
| 9 | कृषि यांत्रिकीकरण - पल्टी नांगर,पाचट कुटी यंत्र, खोडवा तासणी यंत्र, पेरणी यंत्र इ. | किंमतीच्या 40 टक्के किंवा पेरणी यंत्र रू. 20000/-, पल्टी नांगर रू.40000/-, खोडवा कटर रू.45000/-,पाचट कुटी यंत्र रू.80000/- प्रति नग यापैकी कमी असेल इतके |
| 10 | मधपेटयांसाठी अनुदान देणे | खादी व ग्रामोद्योग विभाग व जि.प.कृषि विभाग यांचे संयुक्त विद्यमाने 100% अनुदान |
| 11 | सुधारीत/संकरीत बियाणेसाठी अनुदान | भात,सोयाबीन, मुग, सं.मका, वाटाणा, घेवडा बियाणेसाठी किंमतीच्या 50% किंवा रू.1500/- तर बाजरी व सं.ज्वारी बियाणेसाठी किंमतीच्या 90% किंवा रू.1500/- यापैकी कमी असेल इतके |

**योजनांतर्गत लाभार्थी पात्रतेचे निकष** :- वरील योजनांचा लाभ घेणेसाठी लाभार्थी शेतक-यांनी अर्जासोबत 8/अ उतारा,7/12 उतारा,आधार कार्ड,रेशनकार्ड,बँक पासबुक छायांकीत प्रत, सिंचन सुविधेचा व शेती पंप वीज कनेक्शनचा पुरवा (विदयूतपंपसंच, डिझेल इंजिन,पाईप साठी) ट्रॅक्टरचे RCTC पुस्तकाची छायाप्रत(ट्रॅक्टरचलीत औजारांसाठी ), मधपेटयांचे अनुदानासाठी खादी ग्रामोद्योग विभागाकडील अटी व शर्तींची पुर्तता करणे आवश्यक राहील.

**लाभार्थीची निवड** :- लक्षांकापेक्षा जादा अर्ज प्राप्त झाल्यास पंचायत समितीस्तरावर अर्जदारांची लॉटरी काढून प्राथम्यक्रमानुसार निवड केली जाईल.

**प्रवर्गनिहाय राखीव लक्षांक** :- अ.जाती, अ.जमाती, दिव्यांग व महिला शेतक-यांना शासनाच्या प्रचलीत सुचनांप्रमाणे राखीव लक्षांक राहील.

**योजनेच्या लाभासाठी अर्ज करण्याची मुदत** :- जिल्हयातील शेतक-यांनी पंचायत समिती कार्यालयाशी संपर्क साधून विहीत नमुन्यातील मागणी अर्ज सर्व आवश्यक कागदपत्रांच्या प्रतीसह दि.31 जुलै, 2023 पर्यंत सादर करावेत.

तरी इच्छूक शेतक-यांनी जिल्हा परिषद सेस सन 2023-24 अंतर्गत वरील साहित्यासाठी अनुदानाचा लाभ घेण्यासाठी आपल्या तालुक्याच्या पंचायत समितीच्या कृषि विभागाशी तातडीने संपर्क साधून आपला मागणी अर्ज दि.31 जुलै, 2023 पर्यंत सादर करावा असे अवाहन करण्यात येत आहे.

**(ज्ञानेश्वर खिलारी)** भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,सातारा